दैनिक
# अतुल्य महाराष्ट्र

बीड महाराष्ट्र | रविवार, 2 ऑगस्ट 2026 | अंक क्र. 86 | वर्षे 4 थे | मुल्य 3 रूपये | पृष्ठे 4

WEBSITE : ATULYMAHARASHTRA.COM RNI RGN No. MAH/MAR 2023/52446 EMAIL : DAILYATULYAMAHARASHTRA@GMAIL.COM

''आपल्या माणसांसाठी आपल्या चवीचं हॉटेल''
हॉटेल बालाजी
ब्रम्हवाडी फाटा, बीड रोड, परळी वै.



# आमदार, नामदार नव्हे... कामदार झाल्यावरच लोक लक्षात ठेवतात!

## अण्णाभाऊ साठे जयंतीनिमित्त ना. पंकजाताई मुंडे यांचे प्रतिपादन

## जात किंवा आडनावाने नाही तर कर्तृत्वाने आपली ओळख व्हावी

## शिक्षण, सामाजिक समता व पर्यावरण संवर्धनाचा दिला संदेश

■ परळी वैजनाथ प्रतिनिधी

साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांनी वंचित - उपेक्षितांना बळ दिले, आपल्या साहित्याच्या माध्यमातून त्यांच्या वेदनांना फुंकर घातली. त्यांच्या शिकवणुकीनुसार शिक्षण, सामाजिक समता, पर्यावरण संवर्धन आणि महिलांच्या सक्षमीकरणावर आपण भर दिला पाहिजे. कष्टाला प्रतिष्ठा द्या, कर्तृत्व दाखवा.आमदार, नामदार होऊन नाही तर कामदार झाल्यावरच लोक लक्षात ठेवतात असे प्रतिपादन राज्याच्या पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी केले.

साठेनगर येथे साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या जयंती उत्सवाचे आयोजन करण्यात आले होते, त्यावेळी त्या बोलत होत्या. कार्यक्रमाच्या सुरुवातीस पंचशील ध्वजाचे ध्वजारोहण करून लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेस अभिवादन करण्यात आले. या कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून आ. धनंजय मुंडे यांची प्रमुख उपस्थिती होती.यावेळी व्यासपीठावर नगराध्यक्षा सौ. पद्मश्री बाजीराव धर्माधिकारी, बाजीराव धर्माधिकारी, जुगलकिशोर लोहिया, अजय मुंडे, प्रा. विनोद जगतकर, वैजनाथराव सोळंके, भावड्या कराड, पवन मुंडे, अय्युब खान पठाण, शकील कुरेशी, ॲड. वैजनाथ वाघमारे, अंजली माळी, मीरा नागरगोजे, विक्रम मिसाळ, तानाजी व्हावळे, अश्विन मोगरकर, सुनील मस्के, रमेश मस्के, केशव नागरगोजे, हनुमंत गायकवाड यांसह आदी उपस्थित होते. यावेळी पुढे बोलताना पंकजाताई मुंडे यांनी सांगितले की,अण्णाभाऊ साठे यांच्या चारित्र्याचा आणि त्यांच्या कर्तृत्वाचा अभिमान आम्हा सर्वांना आहे. आज माणसाने स्वतःला वेगवेगळ्या रंगात वाटून घेतले आहे. पण जात, आडनाव यापेक्षा आपली ओळख ही आपल्या कर्तृत्वाने झाली पाहिजे, यासाठी परिश्रम घेण्याची तयारी ठेवा. डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा ज्योतिराव फुले, क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले, छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज आणि लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांनी दिलेले विचार आजही समाजाला दिशा देणारे आहेत. शिक्षण हेच परिवर्तनाचे प्रभावी साधन असून युवकांनी शिक्षणाच्या बळावर समाजात नेतृत्व निर्माण करावे.

समाजात जाती-धर्माच्या भिंती उभ्या करण्याऐवजी सर्वांनी एकोप्याने राहून विकासासाठी योगदान द्यावे, असे सांगत त्यांनी पर्यावरण संरक्षण, वृक्षारोपण आणि नैसर्गिक साधनसंपत्तीच्या जतनाचे महत्त्व अधोरेखित केले. महिलांचे सक्षमीकरण, रोजगारनिर्मिती आणि शासनाच्या विविध योजनांचा लाभ शेवटच्या घटकापर्यंत पोहोचविण्यासाठी शासन कटिबद्ध असल्याचे त्यांनी नमूद केले. दारू बंदीबाबत महिलांच्या भावना व्यक्त करत समाजाने व्यसनमुक्तीकडे वाटचाल करावी. अण्णाभाऊ साठे यांच्या समतेच्या आणि संघर्षाच्या विचारांवर चालण्याचा संकल्प करावा असे आवाहनही त्यांनी केले.






# विमानाचा भीषण अपघात; पर्यटकांचे विमान शेतात कोसळून १३ जणांचा दुर्दैवी मृत्यू

■ दिल्ली वृत्तसंस्था

पेरू देशात पर्यटकांचे विमान शेतात कोसळून भीषण अपघात झाला या दुर्घटनेत १३ जणांचा दुर्दैवी मृत्यू झाला. दक्षिण अमेरिकेतील पेरू देशात एक अत्यंत भीषण आणि दुःखद विमान दुर्घटना घडली आहे. पर्यटनासाठी अत्यंत प्रसिद्ध असलेल्या नाझका लाईन्स परिसरात पर्यटकांना हवाई सफर घडवणारे एक छोटे विमान अचानक शेतात कोसळले. अपघातानंतर विमानाला भीषण आग लागली, ज्यामुळे विमानातील सर्व १३ जणांचा जागीच मृत्यू झाला.

### तांत्रिक बिघाडामुळे; उड्डाणानंतर काही वेळातच घडली दुर्घटना :

पेरूच्या नाझका शहरात घडलेल्या या दुर्घटनेबाबत स्थानिक अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, विमानाने उड्डाण केल्यानंतर अवघ्या काही वेळातच त्यात तांत्रिक बिघाड झाला. तांत्रिक बिघाड (Technical glitch) झाल्यामुळे विमानाने आपले नियंत्रण गमावले आणि ते थेट खाली असलेल्या एका शेतात कोसळले. जमिनीवर आदळताच विमानाचा मोठा स्फोट होऊन त्याला भीषण आग लागली. या भागामध्ये आदल्या दिवशीच वाळूचे वादळ आले होते, आणि त्याच्या दुसऱ्याच दिवशी हा भीषण अपघात घडला.



### मृत व्यक्तींमध्ये परदेशी पर्यटक आणि कर्मचाऱ्यांचा समावेश :

या दुर्दैवी दुर्घटनेत विमानातील सर्व प्रवाशांचा आणि कर्मचाऱ्यांचा मृत्यू झाला आहे. विमानामध्ये एकूण ११ परदेशी पर्यटक आणि २ कर्मचाऱ्यांचा (पायलट व को-पायलट) समावेश होता. सरकारी वृत्तसंस्था अँडिनाने दिलेल्या माहितीनुसार, मृत ११ पर्यटकांमध्ये २ जर्मन, २ स्पॅनिश आणि ७ इटालियन नागरिकांचा समावेश आहे. नाझका विमानतळाजवळ पोहोचत असताना या विमानाचा संपर्क तुटला होता आणि त्यानंतर ही घटना घडल्याची माहिती पेरूच्या व्यापार आणि पर्यटन मंत्रालयाने दिली आहे.

### १४ वर्षांचा अनुभव असणाऱ्या कंपनीचे विमान

ज्या विमानाचा अपघात झाला ते विमान जवळील एका शहरातून निघाले होते. हे विमान पेरूच्या 'एरोडियाना' या प्रसिद्ध विमान कंपनीद्वारे चालवले जात होते. एअरलाइनच्या अधिकृत माहितीनुसार, ही कंपनी गेल्या १४ वर्षांपासून 'सेसना ग्रँड कॅराव्हॅन' प्रकारच्या विमानांचा वापर करून नाझका लाईन्सवरून पर्यटकांसाठी हवाई सफारी आयोजित करत आहे. एवढा मोठा अनुभव असतानाही घडलेल्या या दुर्घटनेमुळे संपूर्ण जगभरात हळहळ व्यक्त केली जात असून स्थानिक प्रशासनाने या घटनेच्या सखोल तपासाचे आदेश दिले आहेत.

# महापालिका मुख्यालय मुख्य आणि विस्तारीत इमारतींच्या दुरुस्तीवर पुन्हा साडेआठ कोटींचा खर्च

■ मुंबई : वृत्तसंस्था

मुंबई महापालिका मुख्यालयातील विस्तारीत सहा मजल्याच्या इमारतीच्या नुतनीकरणाचे काम तब्बल १४ वर्षे सुरु होते आणि ते सन २०२३-२४मध्ये संपले. यापूर्वी आतापर्यंत मुख्यालय इमारतींवर १२० कोटींहून अधिकचा खर्च केल्यांनतर आता पुढील दोन वर्षांत या विस्तारीत इमारतीच्या डागडुजीवर तब्बल साडे आठ कोटी रुपये खर्च केले जाणार आहेत. या इमारतीला वाळवी लागल्याच्या प्रकरणावरून स्थायी समितीने याची विस्तृत माहितीच सादर करण्याचे निर्देश यापूर्वी दिलेले आहेत.

मुंबई महानगरपालिका मुख्यालयाची विस्तारीत इमारत ही सन १९६० मध्ये बांधण्यात आली आहे. यापूर्वी, या इमारतीचे नूतनीकरण, व दुरुस्तीचे काम महानगरपालिकेच्या इमारत बांधकाम विभागामार्फत सन २०१४ साली करण्यात आले. या कामासाठी कंत्राटदार शानदार इंटेरिअर प्रा. लि. आणि प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून मे. शशी प्रभू अँड असोसिएट्स यांची नियुक्ती करण्यात आली होती. त्यानंतर कंत्राटदार मे. शानदार इंटेरिअर प्रा.लि. यांच्याकडून इमारतीची टप्प्याटप्प्याने दुरुस्ती करण्यात आली. या दुरुस्तीचा अंतीम टप्पा सन २०२३-२४ मध्ये पुर्ण झाल्यानंतर इमारत दुरुस्तीचे काम इमारत बांधकाम खात्याकडून संपुष्टात आले. पण आता पुन्हा या इमारतीच्या डागडुजीचे काम हाती घेण्यात आले आहे. इमारतीच्या कोर्ट व आझाद मैदान भागाकडील बाह्यभागावरील मालाड क्रेट व बाह्य प्लास्टरची दुरुस्ती करणे, एक्स्साईज इमारत दिशेच्या इमारतीच्या बाह्यभागावरील व अंतर्गत भागातील खराब झालेले सीआय, जीआय पाईप्स बदली करणे, इमारतीच्या आझाद मैदान दिशेकडील दगडी भिंतीची स्वच्छता व फ्लश पॉइंटिंग करणे.

# माळशेज घाटात रस्ता खचला; मार्ग पूर्णपणे बंद!

# पर्यायी मार्गावर रात्रभर भीषण वाहतूक कोंडी

■ मुंबई : प्रतिनिधी

कल्याण-अहिल्यानगर महामार्गावरील प्रसिद्ध माळशेज घाटातील रस्ता खचल्यामुळे हा मार्ग वाहतुकीसाठी पूर्णपणे बंद करण्यात आला आहे. रस्ता खचल्याची घटना घडताच प्रशासनाने सुरक्षेचा उपाय म्हणून या मार्गावरील वाहतूक तातडीने रोखली आहे. मात्र, यामुळे वीकेंडला फिरण्यासाठी बाहेर पडलेल्या हजारो पर्यटक आणि प्रवाशांचे प्रचंड हाल होत असून घाटात आणि पर्यायी मार्गांवर वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या आहेत.

■ दुरुस्तीचे काम युद्धपातळीवर :


खचलेल्या भागाच्या दुरुस्तीचे काम प्रशासनाकडून युद्धपातळीवर सुरू करण्यात आले आहे. परंतु, कामाचा वेग आणि परिस्थिती लक्षात घेता रस्ता पूर्णपणे सुस्थितीत येऊन वाहतूक पूर्ववत होण्यासाठी आणखी काही वेळ लागण्याची शक्यता वर्तवली जात आहे. त्यामुळे वाहतूक पोलिसांनी आणि स्थानिक प्रशासनाने खबरदारीचा उपाय म्हणून सर्व वाहने पर्यायी मार्गाने वळवली आहेत.

■ पर्यायी मार्गांची दुरावस्था :

प्रशासनाने वाहतूक पर्यायी मार्गाने वळवली असली, तरी या पर्यायी रस्त्यांची परिस्थिती अत्यंत बिकट आहे. पर्यायी मार्ग अत्यंत अरुंद (बारीक) आणि एकेरी (Single lane) आहेत. अनेक ठिकाणी रस्त्यांची अवस्था खराब आणि खड्डेमय झाली आहे. शनिवार रात्रीपासूनच या मार्गावर हजारो वाहने एकाच वेळी आल्यामुळे प्रचंड वाहतूक कोंडी निर्माण झाली आहे. या भीषण कोंडीमुळे सुमारे २००० हून अधिक प्रवासी आणि पर्यटक रात्रीपासून रस्त्यावर अडकून पडले आहेत. तासन् तास वाहने एकाच जागी उभी राहिल्याने प्रवासी, नागरिक आणि लहान मुलांना मोठा मनस्ताप सहन करावा लागत आहे.

■ पावसाळ्यात वाढणारी वाहनांची गर्दी :

माळशेज घाट हा मुंबई, ठाणे, पुणे आणि अहिल्यानगर परिसराला जोडणारा अत्यंत महत्त्वाचा मार्ग आहे. विशेषतः पावसाळ्याच्या दिवसांत येथील निसर्गसौंदर्य आणि धबधबे पाहण्यासाठी दर वीकेंडला हजारो पर्यटक मोठी गर्दी करतात. शनिवार आणि रविवारी या मार्गावर वाहनांची संख्या आधीच प्रचंड असते. त्यातच मुख्य रस्ता बंद झाल्यामुळे आणि पर्यायी मार्गांची क्षमता मर्यादित असल्याने आज रविवारीही दिवसभर अत्यंत भीषण वाहतूक कोंडीची शक्यता व्यक्त केली जात आहे.



## थोडक्यात

### राष्ट्रीय साहसी पुरस्कारासाठी अर्ज करण्याचे आवाहन

**मुंबई :** युवा कार्यक्रम व क्रीडा मंत्रालय, भारत सरकारतर्फे साहसी क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना 'तेनझिंग नोर्गे राष्ट्रीय साहसी पुरस्कार' प्रदान करण्यात येतो. सन २०२५ च्या पुरस्कारासाठी पात्र खेळाडूंनी ३० जुलै ते २० ऑगस्ट २०२६ या कालावधीत केंद्र शासनाच्या ऑनलाइन पोर्टलवर अर्ज सादर करावे, असे आवाहन मुंबई उपनगरच्या जिल्हा क्रीडा अधिकारी सायली जाधव यांनी केले आहे. जमिनीवरील, समुद्रावरील आणि हवाई साहसी उपक्रमांमध्ये उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्यांना प्रत्येकी एक पुरस्कार दिला जातो. तसेच साहसी क्षेत्रातील आजीवन योगदानासाठी स्वतंत्र पुरस्कारही प्रदान करण्यात येतो. सन २०२५ च्या पुरस्कारासाठी शिफारस करण्यात येणाऱ्या खेळाडूंची कामगिरी सन २०२३, २०२४ आणि २०२५ या तीन वर्षांतील असणे आवश्यक आहे. संबंधित साहसी उपक्रम हे जमीन, पाणी किंवा हवाई क्षेत्रातील असावेत तसेच खेळाडूची कामगिरी अतिउत्कृष्ट स्वरूपाची असणे आवश्यक आहे. पुरस्कारासाठीची नामांकने केंद्र शासनाच्या https://awards.gov.in या ऑनलाइन पोर्टलवरच स्वीकारली जाणार असून, मंत्रालयाकडे ऑफलाइन पद्धतीने प्राप्त होणाऱ्या अर्जांची कोणतीही दखल घेतली जाणार नाही व ते थेट नाकारण्यात येतील, असेही प्रसिद्धीपत्रकात नमूद करण्यात आले आहे.

### महिला समुपदेशन केंद्रासाठी अर्ज करण्याचे आवाहन

**मुंबई :** महिला व बालकांवरील अत्याचारास प्रतिबंध करण्याच्या उद्देशाने मुंबई उपनगर जिल्ह्यातील भांडुप पोलीस ठाणे येथे महिला समुपदेशन केंद्र सुरू करण्यात येणार आहे. यासाठी पात्र स्वयंसेवी संस्थांकडून बातमी प्रसिद्ध झाल्यापासून कार्यालयीन कामकाजाचे दहा दिवसांच्या आत अर्ज मागविण्यात आले आहेत. अर्जदार संस्थेची आवश्यक नोंदणी, महिला समुपदेशन क्षेत्रातील किमान तीन वर्षांचा अनुभव, एमएसडब्ल्यू (MSW) उत्तीर्ण दोन समुपदेशक, मागील तीन वर्षांचे लेखापरीक्षण अहवाल, बँक स्टेटमेंट तसेच इतर आवश्यक कागदपत्रे जोडणे बंधनकारक आहे. यापूर्वी प्रस्ताव सादर केलेल्या स्वयंसेवी संस्थांनीही नव्याने अर्ज करावा. अधिक माहितीसाठी जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालय, मुंबई उपनगर, प्रशासकीय इमारत, दुसरा टप्पा, पहिला मजला, आर.सी. मार्ग, चेंबूर, मुंबई–७१ येथे संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, मुंबई उपनगर यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे केले आहे.

### नवीन शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांच्या उभारणीला गती

**मुंबई :** राज्यातील गोंदिया, नंदुरबार, अलिबाग, बुलढाणा, जालना, धुळे आणि हिंगोली येथील नवीन शासकीय वैद्यकीय महाविद्यालये व संलग्न रुग्णालयांच्या उभारणीची कामे नियोजनबद्ध पद्धतीने वेगाने सुरू असून या सर्व प्रकल्पांचा नियमित आढावा घेऊन कामांतील अडथळे तातडीने दूर करण्याचे निर्देश वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांनी दिले. राज्याच्या प्रत्येक भागात आधुनिक आरोग्य सुविधा आणि गुणवत्तापूर्ण वैद्यकीय शिक्षण उपलब्ध करून देण्यासाठी शासन कटिबद्ध असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. मंत्रालयात मंत्री मुश्रीफ यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या आढावा बैठकीत गोंदिया, नंदुरबार, अलिबाग, बुलढाणा, जालना, धुळे आणि हिंगोली येथील वैद्यकीय महाविद्यालयांच्या बांधकाम प्रगतीचा सविस्तर आढावा घेण्यात आला. यावेळी वैद्यकीय शिक्षण विभागाचे सचिव धीरज कुमार, आयुक्त अनिल भंडारी तसेच संबंधित महाविद्यालयांचे अधिष्ठाता दूरदृष्य प्रणाली द्वारे उपस्थित होते.गोंदिया येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाच्या बांधकामाची भौतिक प्रगती सुमारे ४२ टक्क्यांपर्यंत पोहोचली असून आवश्यक सुधारित आराखडा शासनाकडे सादर करण्याची प्रक्रिया सुरू आहे. महाविद्यालय अधिक आधुनिक आणि भविष्यातील गरजा लक्षात घेऊन उभारण्यात येत असून पाणीपुरवठा, विद्युत व्यवस्था आणि इतर मूलभूत सुविधांबाबत आवश्यक कार्यवाही वेगाने सुरू आहे.नंदुरबार येथील १०० विद्यार्थी क्षमतेच्या वैद्यकीय महाविद्यालय व ५०० खाटांच्या रुग्णालयाच्या प्रकल्पाची भौतिक प्रगती जवळपास ४९ टक्क्यांपर्यंत झाली असून पाणीपुरवठा योजनेसाठी आवश्यक प्रक्रिया सुरू आहे. अलिबाग येथील वैद्यकीय महाविद्यालय, रुग्णालय व वसतिगृहांच्या बांधकामातही सातत्याने प्रगती होत असून विविध इमारतींच्या संरचनात्मक कामांना गती देण्यात आली आहे.बुलढाणा, जालना, धुळे आणि हिंगोली येथील प्रकल्पांमध्येही बांधकाम नियोजनानुसार सुरू आहे. आवश्यक निधी उपलब्ध करून देणे, पाणीपुरवठा योजना, विद्युत जोडणी, फर्निचर आणि इतर सुविधा वेळेत उपलब्ध करण्यासाठी शासनस्तरावर आवश्यक कार्यवाही सुरू असल्याची माहिती बैठकीत देण्यात आली.यावेळी मंत्री हसन मुश्रीफ म्हणाले, "राज्यातील प्रत्येक नागरिकाला त्यांच्या जिल्ह्यात अत्याधुनिक आरोग्यसेवा उपलब्ध व्हावी आणि विद्यार्थ्यांना दर्जेदार वैद्यकीय शिक्षणासाठी दूर जावे लागू नये, हा राज्य शासनाचा उद्देश आहे. त्यामुळे सर्व प्रकल्प निर्धारित कालमर्यादेत आणि उच्च दर्जा राखून पूर्ण करण्यास प्राधान्य दिले जात आहे. प्रकल्पांच्या गुणवत्तेबाबत कोणतीही तडजोड केली जाणार नाही. सर्व संबंधित यंत्रणांनी समन्वयाने काम करून ही महत्त्वाकांक्षी प्रकल्पे लवकरात लवकर पूर्ण करावीत."प्रत्येक प्रकल्पातील भौतिक व आर्थिक प्रगती, निधी उपलब्धता, पाणीपुरवठा, वीज, फर्निचर, आवश्यक परवानग्या तसेच इतर पायाभूत सुविधांचा तपशीलवार आढावा घेऊन संबंधित यंत्रणांना वेळेत काम पूर्ण करण्याचे निर्देश मंत्री मुश्रीफ यांनी यावेळी दिले.

# कचरा वर्गीकरण व जलसंचयन संदेश प्रसारण

■ नवी मुंबई : प्रतिनिधी




'स्वच्छ सर्वेक्षण 2025-26' अंतर्गत 'सफाई अपनाओ, बिमारी भगाओ' या अभियानाच्या अनुषंगाने लोकसहभागावर भर देत स्वच्छताविषयक विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. या अंतर्गत नवी मुंबई महानगरपालिका शाळा क्रमांक 115, सेक्टर 15, वाशी तसेच नमुंमपा शाळा, सेक्टर 20, नेरूळ गाव याठिकाणी विशेष जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

यावेळी ॲन्थोनी वेस्ट हॅन्डलिंग व परिसर सखी विकास संस्था यांच्यामार्फत विद्यार्थ्यांना कचरा वर्गीकरणाबाबत माहिती देण्यात आली व वर्गीकरणाचे महत्व पटवून देण्यात आले. त्यासोबतच आरोग्याविषयी चांगल्या सवयी, पावसाळा कालावधीत आरोग्याच्या दृष्टीने घ्यावयाची काळजी याविषयी माहिती देण्यात आली. विद्यार्थ्यांनी आपल्या घरी कचरा वर्गीकरण होत असल्याची काळजी घ्यावी तसेच इतरांनाही याबाबत माहिती देऊन त्याचे महत्व सांगून प्रोत्साहित करावे असे सांगण्यात आले.त्याचप्रमाणे सध्या पंतप्रधान महोदयांच्या संकल्पनेतून पावसाळी पाण्याचे संचयन करणारे कॅच द रेन अभियान सर्वत्र सुरू असून त्याचीही माहिती देणारा उपक्रम घणसोली सेक्टर 7 येथे नमुंमपा शाळा क्रमांक 76, ऐरोली सेक्टर 7 येथील जमनाबाई जनार्दन मढवी शाळा त्याचप्रमाणे ऐरोली सेक्टर 17 येथील विसावा सोसायटी घणसोली जिजामातानगर मध्ये राबविण्यात आला. या अंतर्गत पिण्याचे पाणी वाया घालवू नका, त्याकरिता पर्याय म्हणून पावसाचे पाणी साठवा, घरावर पडणारे पावसाचे पाणी पाईपद्वारे साठवणूक टाकीत गोळा करा (रेन वॉटर हार्वेस्टिंग) तसेच वृक्षारोपण करा, कारण झाडे लावल्यामुळे पावसाचे पाणी जमिनीत मुरण्यास मदत होते अशी महत्वपूर्ण माहिती देण्यता आली.

नवी मुंबईच्या महापौर सुजाता पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली, आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या निर्देशानुसार, अतिरिक्त आयुक्त सुनील पवार आणि वैद्यकिय आरोग्य अधिकारी डॉ. राजेश म्हात्रे व घनकचरा व्यवस्थापन विभाग उपआयुक्त डॉ. अजय गडदे यांच्या नियंत्रणाखाली, 'सफाई अपनाओ, बिमारी भगाओ' अभियानांतर्गत विविध उपक्रम राबविले जात असून त्यामध्ये नागरिक सहभागावर भर देण्यात येत आहे, तसेच नवी मुंबईचे भविष्य असणारे उद्याचे नागरिक अर्थात विद्यार्थी यांच्यावर स्वच्छता आणि जलबचतीचे संस्कार करण्यावर भर दिला जात आहे.



## स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणारे प्रशिक्षणवर्ग

■ नवी मुंबई : प्रतिनिधी

स्वच्छ सर्वेक्षण 2025-26 च्या अनुषंगाने 'सफाई अपनाओ, बिमारी भगाओ' या अभियानांतर्गत विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे. महापौर सुजाता पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली, आयुक्त डॉ.कैलास शिंदे साहेब यांच्या निर्देशानुसार, अतिरिक्त आयुक्त सुनील पवार व घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपआयुक्त डॉ.अजय गडदे यांच्या नियंत्रणाखाली ठिकठिकाणी विशेष स्वच्छता मोहिमांप्रमाणेच क्षमता बांधणी कार्यशाळा आयोजित करण्यात येत आहेत.

या अनुषंगाने आज नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील महिला बचत गटांमधील (SHGs) महिलांना उपजिविका आणि स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी विविध प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. प्रत्येक विभाग कार्यालय क्षेत्रात एक ठिकाणी अशा 8 ठिकाणी झालेल्या या प्रशिक्षण वर्गाचा लाभ महिला बचत गटातील 385 महिलांनी घेतला. यामध्ये केंद्रीकृत सुका कचरा प्रक्रिया केंद्र चालविणे, श्री आर केंद्र चालविणे, ई – कचरा केंद्र चालविणे, जुन्या कपड्यांचा पुनर्वापर करणे व पुनर्निर्मिती करणे, प्लास्टिक कच-याचा पुनर्वापर करणे, फुलांच्या निर्माल्यापासून अगरबत्ती तयार करणे आणि सेंद्रिय खत निर्मिती व बायोगॅस प्रकल्प या विषयांवर रोजागाराभिमुख प्रशिक्षण देण्यात आले. घनकचरा व्यवस्थापनाच्या अनुषंगाने महिला बचत गटांमधील महिलांची क्षमता बांधणी करण्यासाठी कौशल्य मल्टिक्रिएशन्स या संस्थेच्या सहकार्याने 8 ठिकाणी आयोजित या मोफत प्रशिक्षण वर्गाचे आयोजन घनकचरा व्यवस्थापन विभाग आणि समाजविकास विभाग यांनी सहयोगाने केले. महिला बचत गट (SHGs) व अशासकीय संस्था (NGOs) प्रतिनिधींचा सहभाग वाढविण्यासाठी समाजविकास विभागातील समुह संघटक यांनी सहकार्य केले तसेच दुर्गा फांऊडेशन यांनीही आयोजन सहकार्य केले.

स्वच्छ भारत अभियान नागरी 2.0 च्या अनुषंगाने स्वच्छता कार्यात योगदान देण्यासोबतच महिलांना व्यावसायिक प्रशिक्षणाची संधी देणा-या या क्षमता वर्धक उपक्रमाला महिलांचा चांगला प्रतिसाद लाभला. प्रशिक्षणार्थी महिलांना प्रमाणपत्रे देण्यात आली.

## नवीन कामगार नियमावली आणि औद्योगिक विकासाला नवी दिशा

■ मुंबई : प्रतिनिधी

राज्यातील कामगारांचे हक्क, सुरक्षितता, सामाजिक संरक्षण आणि औद्योगिक विकास यांचा समतोल साधत महाराष्ट्राला अधिक कामगारहितैषी व उद्योगस्नेही राज्य बनविण्याच्या राज्य शासनाच्या प्रयत्नांचा वेध घेणारी कामगारमंत्री ॲड. आकाश फुंडकर यांची विशेष मुलाखत माहिती व जनसंपर्क महासंचालनालय निर्मित 'जय महाराष्ट्र' आणि 'दिलखुलास' या लोकप्रिय कार्यक्रमांमधून प्रसारित करण्यात येणार आहे.

'कामगार हित, नवीन कामगार नियमावली आणि औद्योगिक विकासाला नवी दिशा' या विषयावरील या विशेष संवादामध्ये नवीन कामगार नियमावलीची अंमलबजावणी, कामगार कल्याणकारी योजनांचा विस्तार, बांधकाम कामगारांचे कल्याण, गिग वर्कर्सचे सामाजिक संरक्षण, महिला कामगारांचे सक्षमीकरण, कामगारांच्या सुरक्षिततेसाठी राबविण्यात येणारे उपाय, वेतन प्रक्रियेतील पारदर्शकता, उद्योगस्नेही वातावरण निर्मिती तसेच राज्य शासनाच्या विविध उपक्रमांची सविस्तर माहिती मंत्री ॲड. आकाश फुंडकर 'जय महाराष्ट्र' आणि 'दिलखुलास' कार्यक्रमातून दिली आहे.'जय महाराष्ट्र' कार्यक्रमात ही मुलाखत मंगळवार, ४ ऑगस्ट २०२६ रोजी रात्री ८.०० वाजता दूरदर्शनच्या सह्याद्री वाहिनीवर प्रसारित होणार आहे. तसेच ही मुलाखत माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या अधिकृत समाजमाध्यमांवरही उपलब्ध होणार आहे. याचबरोबर 'दिलखुलास' कार्यक्रमात ही मुलाखत ४, ५ आणि ६ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी ७.२५ ते ७.४० या वेळेत आकाशवाणीच्या सर्व केंद्रांवरून तसेच 'News on AIR' या ॲपवरून प्रसारित करण्यात येणार आहे.कामगारांच्या जीवनमानात सकारात्मक बदल घडवून आणणे, सुरक्षित व सन्मानजनक रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे, सामाजिक संरक्षण अधिक प्रभावी करणे आणि उद्योग विकासाला आवश्यक असे सक्षम, पारदर्शक व विश्वासार्ह वातावरण निर्माण करण्यासाठी राज्य शासन कटिबद्ध आहे. या पार्श्वभूमीवर ही विशेष मुलाखत कामगार, उद्योग क्षेत्र, नियोक्ते तसेच सर्वसामान्य नागरिकांसाठी मार्गदर्शक आणि माहितीपूर्ण ठरणार आहे.

## माजी सैनिकांसाठी संकुल उभारण्याच्या प्रकल्पाला गती द्या

■ मुंबई : प्रतिनिधी

राज्यपालांच्या निर्देशानुसार सातारा आणि पंढरपूर येथील महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ तसेच माजी सैनिक कल्याण विभागामार्फत माजी सैनिक आणि त्यांच्या कुटुंबीयांसाठी सर्व सोयी-सुविधांयुक्त अद्ययावत संकुल उभारण्यात येणार आहे. या जागांच्या एकात्मिक विकास प्रकल्पाला गती देण्याचे निर्देश पर्यटन, खनिकर्म व माजी सैनिक कल्याण मंत्री शंभूराज देसाई यांनी दिले.

सह्याद्री अतिथीगृह येथे सातारा व पंढरपूर येथील महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ आणि माजी सैनिक कल्याण विभागाकडील जागेच्या एकत्रित विकासासंदर्भात आयोजित बैठकीत मंत्री. देसाई बोलत होते. बैठकीला पर्यटन विभागाचे अपर मुख्य सचिव संजय खंदारे, माजी सैनिक कल्याण विभागाचे अपर मुख्य सचिव संतोष कुमार, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक नीलेश गटणे, उपसचिव विजय पोवार उपस्थित होते. तर दूरदृश्य प्रणालीद्वारे माजी सैनिक कल्याण (पुणे विभाग) संचालक, सातारा जिल्हाधिकारी, सोलापूर निवासी उपजिल्हाधिकारी, पंढरपूर देवस्थान समितीचे मुख्य कार्यकारी अधिकारी, सातारा व सोलापूर जिल्ह्याचे माजी सैनिक कल्याण अधिकारी सहभागी झाले होते. माजी सैनिक कल्याण मंत्री देसाई यांनी सांगितले की, सातारा येथे उभारण्यात येणाऱ्या संकुलाच्या माध्यमातून वीरपत्नी, माजी सैनिकांच्या पत्नींनी स्थापन केलेल्या बचत गटांनी तयार केलेल्या उत्पादनांना कायमस्वरूपी बाजारपेठ उपलब्ध करून देण्यात येणार आहे. त्याद्वारे त्यांच्या आर्थिक सक्षमीकरणाला चालना मिळणार आहे. हा उपक्रम माजी सैनिकांच्या कल्याणाचा नवा आदर्श निर्माण करणारा राज्यातील पहिलाच एकात्मिक विकास प्रकल्प आहे. या विकास प्रकल्पामध्ये पर्यटन विकासाबरोबरच माजी सैनिकांच्या कल्याणाला सर्वोच्च प्राधान्य देण्यात येणार आहे. प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी आवश्यक नियोजन, विभागांमधील प्रभावी समन्वय आणि समयबद्ध कार्यवाही सुनिश्चित करण्याच्या सूचनाही त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या.

## पालकांचे शपथपत्र प्रवेशासाठी ग्राह्य धरण्याचे प्रशासनाचे स्पष्ट निर्देश

■ मुंबई : प्रतिनिधी


राज्यातील शैक्षणिक संस्थांमध्ये प्रवेश घेताना अल्पसंख्याक विद्यार्थ्यांना वैयक्तिक अल्पसंख्याक प्रमाणपत्राची/दाखल्याची सक्ती केली जाऊ नये, असे स्पष्ट निर्देश महाराष्ट्र शासनाच्या अल्पसंख्याक विकास विभागाने दिले आहेत. शासन निर्णयानुसार विहित केलेले पुरावे ग्राह्य धरून विद्यार्थ्यांना तात्काळ प्रवेश देण्याचे आवाहन विभागाने केले आहे. महाराष्ट्र शासनाने मुस्लिम, ख्रिश्चन, शीख, बौद्ध, झोराष्ट्रीयन (पारसी), जैन आणि ज्यु या ७ लोकसमूहांना "अल्पसंख्याक लोकसमूह" म्हणून घोषित केले आहे. शासनाच्या प्रचलित धोरणानुसार राज्य शासनाकडून धार्मिक अथवा भाषिक अल्पसंख्याक समुदायातील व्यक्तींना वैयक्तिक स्तरावर कोणतेही वेगळे अल्पसंख्याक प्रमाणपत्र किंवा दाखला दिला जात नाही.सध्या शैक्षणिक वर्ष २०२६-२७ ची प्रवेश प्रक्रिया सुरू असताना, काही शैक्षणिक संस्थांकडून विद्यार्थ्यांकडे वैयक्तिक अल्पसंख्याक प्रमाणपत्राची मागणी केली जात असल्याचे शासनाच्या निदर्शनास आले आहे.

# ठाण्याला नवीन अतिरिक्त जिल्हाधिकारी कार्यालयासह दोन तहसील कार्यालय होणार

■ ठाणे प्रतिनिधी

'छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानांतर्गत समाधान शिबिराच्या माध्यमातून ठाणे जिल्ह्यातील तब्बल ७६ हजार कुटुंबांना शासकीय योजनांचा थेट लाभ देण्यात यश आले असून, हे अभियान लोकाभिमुख आणि गतिमान कारभाराचे उत्तम उदाहरण ठरले आहे, असे प्रतिपादन राज्याचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केले.

त्याबरोबरच ठाण्याला नवीन अतिरिक्त जिल्हाधिकारी कार्यालय आणि दोन नवीन तहसील कार्यालय देखील होणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस महोदयांचा जन्मदिवस आणि माजी उपमुख्यमंत्री स्वर्गीय अजित दादा पवार यांच्या जयंतीचे औचित्य साधून राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या संकल्पनेतून आणि ठाणे जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांच्या पुढाकारातून ठाण्यातील गडकरी रंगायतन समोरील शिवसमर्थ विद्यालयात आज आयोजित 'छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिराच्या कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी आमदार संजय केळकर, आमदार मंदाताई म्हात्रे, आमदार निरंजन डावखरे, आमदार विक्रांत पाटील, आमदार माधवी नाईक, आमदार रविंद्र फाटक, आमदार किसन कथोरे, आमदार कुमार आयलानी, ठाणे महानगरपालिकेचे उपमहापौर कृष्णा पाटील, जिल्हाधिकारी डॉ.श्रीकृष्ण पांचाळ, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी रणजीत यादव, अपर जिल्हाधिकारी हरिश्चंद्र पाटील, निवासी उपजिल्हाधिकारी डॉ. संदिप माने यांच्यासह सर्व उपजिल्हाधिकारी, प्रांताधिकारी, तहसिलदार, ॲड. संदीप लेले यांच्यासह विविध विभागाचे पदाधिकारी आणि मोठया संख्येने नागरीक उपस्थित होते. महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचे कार्यक्रमस्थळी जल्लोषात स्वागत करण्यात आले. कार्यक्रमस्थळी प्रवेश केल्याबरोबर त्यांनी विविध शासकीय स्टॉल्सला भेट देऊन पाहणी केली. त्यानंतर महसूल मंत्री बावनकुळेंसह उपस्थित मान्यवरांनी छत्रपती शिवाजी महाराज आणि माजी उपमुख्यमंत्री स्वर्गिय अजितदादा पवार यांच्या प्रतिमांना पुष्प अर्पण करुन अभिवादन केले.महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी ठाणे जिल्हा प्रशासन आणि जिल्हाधिकाऱ्यांच्या नियोजनबद्ध कामाचे विशेष अभिनंदन केले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसाच्या औचित्याने राबविण्यात आलेल्या या सेवा उपक्रमात महसूल खात्यासह महिला व बालविकास, क्रीडा, आरोग्य, कृषी, पशुसंवर्धन आणि आदिवासी विकास अशा सर्वच विभागांनी एकत्र येत राज्यात १० लाख कुटुंबांना लाभ देण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. यात ठाणे जिल्ह्याने अव्वल कामगिरी केली असून आमदार संजय केळकर यांनी एकट्या आपल्या मतदारसंघात ८ हजार कुटुंबांना लाभ मिळवून दिला, तर भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या पुढाकाराने रक्तदान शिबिराचे यशस्वी आयोजन करण्यात आले, असे महसूल मंत्री बावनकुळे यांनी नमूद केले.महसूल मंत्री बावनकुळे यांनी यावेळी ठाणे आणि पालघर परिसरासाठी शासनाने घेतलेल्या अनेक महत्त्वाच्या निर्णयांची माहिती दिली. कल्याण-अंबरनाथ भागात कृषी उत्पन्न बाजार समिती व मल्टी-मॉडेल हब उभारणीसाठी, तसेच वाढवण बंदराला जोडणाऱ्या प्रकल्पांसाठी महसूल विभागाने मोफत जमीन उपलब्ध करून



दिली आहे. याशिवाय पर्यावरण रक्षणासाठी ७३.७३ एकर जागा कांदळवनासाठी, ठाण्यात ॲग्री-युनिट व कन्व्हेन्शनल सेंटर, बीएसएनएलच्या ६० टॉवर्ससाठी जमीन, अंबरनाथ येथे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नवोदय विद्यालय, तसेच मीरा-भाइंदर येथे एमटीपी प्लांट व कोस्टल रोडसाठी २५ एकर जागा देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. मीरा- भाईंदरमधील ३१८ एकर व पिंपरी येथील १३ एकर जमिनीला 'वर्ग-२' चा दर्जा देऊन झोपडपट्टी विकास व शासकीय जमिनींचे संरक्षण करण्यात आले असून,२६८ कर्मचाऱ्यांचा अनुकंपातत्त्वावर भरतीचा प्रश्नही निकाली काढण्यात आला आहे.नागरिकांना दिलासा देणाऱ्या कायदेशीर निर्णयांवर प्रकाश टाकताना श्री. बावनकुळे यांनी सांगितले की, बिगरशेती (NA) परवानग्यांची अट पूर्णपणे रद्द करण्यात आली असून तुकडेबंदी कायदा मागे घेण्यात आला आहे. यामुळे १५ ऑक्टोबर २०२३ पूर्वी ठाण्यात बांधण्यात आलेल्या लहान प्लॉट्सवरील सुमारे १ लाख कुटुंबांना कायदेशीर हक्क मिळणार आहेत. तसेच १ जानेवारी २०११ पूर्वी शासकीय जागांवर असलेल्या सर्व घरांना पट्टे वाटप करून ते नियमित केले जाणार आहेत. येत्या डिसेंबरच्या अधिवेशनात राज्यातील सर्व फ्लॅटधारकांना हक्काचे 'प्रॉपर्टी कार्ड' देण्याचा आणि जगातील अत्याधुनिक 'लँड टायटलिंग कायदा' (Land Titling Act) मंजूर करण्याचा ऐतिहासिक निर्णय शासन घेणार आहे. यामुळे डिजिटल चिपयुक्त स्मार्ट प्रॉपर्टी कार्ड मिळेल आणि जमिनीची १५ दिवसांत मोजणी, नोंदणी व म्युटेशन ही प्रक्रिया अत्यंत पारदर्शक व सुलभ होईल, असा विश्वास महसूल मंत्री बावनकुळे यांनी यावेळी व्यक्त केला.महसूल मंत्री बावनकुळे यांनी यावेळी या शिबिरास उपस्थित नागरिकांच्या अडचणी, तक्रारी, समस्यांची लेखी निवेदने स्वीकारली आणि त्यांच्या निवेदनांवर त्वरीत कार्यवाही करण्याचे संबंधितांना आदेश दिले.आमदार संजय केळकर यांनी संपूर्ण राज्यात आणि ठाण्यात 'महाराजस्व अभियान' यशस्वीपणे राबवल्याबद्दल महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या संकल्पाचे तसेच जिल्हाधिकारी व महसूल प्रशासनाच्या प्रयत्नांचे विशेष कौतुक केले. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली सुरू झालेल्या लोककल्याणकारी योजनांचा लाभ तळागाळातील प्रत्येक नागरिकापर्यंत पोहोचवणे हेच महायुती सरकारचे मुख्य ध्येय असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.या शिबिरात उभारण्यात आलेल्या २० हून अधिक स्टॉल्सचा आणि विविध शासकीय सेवांचा लहानांपासून मोठ्यांपर्यंत सर्वांनी जास्तीत जास्त फायदा घ्यावा, असे आवाहनही त्यांनी आपल्या भाषणातून केले.आमदार मंदाताई म्हात्रे यांनी 'महाराजस्व अभियाना'च्या माध्यमातून शासकीय सेवा जनतेच्या दारात आणल्याबद्दल आणि प्रकल्पग्रस्तांचे प्रलंबित प्रश्न सोडवल्याबद्दल महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचे आभार मानले. या अभियानामुळे महसूल प्रशासन अधिक जागृत व गतिमान झाले असल्याचे सांगत, त्यांनी नवी मुंबईतील नागरिकांसाठी १५ ऑगस्टनंतर असेच भव्य शिबिर आयोजित करण्याची मागणी केली.आमदार निरंजन डावखरे यांनी ब्रिटिशकालीन क्लिष्ट महसुली कायद्यांमध्ये अमूलाग्र बदल करून ते लोकहितार्थ सुलभ केल्याबद्दल महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचे कौतुक केले. 'महाराजस्व अभियाना'च्या माध्यमातून समाजातील शेवटच्या घटकापर्यंत (अंत्योदय) योजनांचे लाभ पोहोचत असून, या शिबिरासाठी अहोरात्र मेहनत घेणाऱ्या महसूल अधिकाऱ्यांच्या तत्परतेचा त्यांनी विशेष गौरव केला. आमदार विक्रांत पाटील यांनी बिगरशेती (NA) मंजुरी रद्द करणे, शेत-रस्ते अतिक्रमणमुक्त करणे आणि २०११ पूर्वीची बांधकामे नियमित करणे यांसारख्या ऐतिहासिक महसुली निर्णयांबद्दल महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचे कौतुक केले. 'महाराजस्व अभियाना'च्या माध्यमातून मंत्रालयातील योजना थेट जनतेच्या दारात आणून एकाच छताखाली हजारो लाभार्थ्यांना तात्काळ लाभ मिळवून दिल्याबद्दल त्यांनी आभार व्यक्त केले.आमदार माधवी नाईक यांनी आपल्या भाषणात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे कौतुक करताना सांगितले की, राज्य सरकारने राबवलेल्या विविध लोककल्याणकारी योजनांमुळे महिलांना सक्षम आणि स्वावलंबी बनविण्याचे मोठे काम झाले आहे. छत्रपती शिवाजी महाराजांप्रमाणेच हे रयतेचे राज्य असल्याचे सांगत, सर्व लाभार्थ्यांनी या योजनांची माहिती अधिक लोकांपर्यंत पोहोचवून राज्य सुजलाम सुफलाम करण्यासाठी सहभाग नोंदवावा.

दैनिक पत्रक प्रकाशक मालक संपादक श्री. नितीन सोपानराव ढाकणे मुद्रक विठ्ठल त्रिंबक साबळे मातोश्री ऑफसेट प्रिंटर्स, मोंढा, हैद्राबाद बँकेजवळ परळी वैजनाथ, जि. बीड पिन - 431515 येथे छापुन मुख्य कार्यालय दैनिक अतुल्य महाराष्ट्र, जलालपुर रोड परळी वै. ता. परळी वै.जि.बीड (महाराष्ट्र) पिन - 431515 येथे प्रकाशित केले आहे. संपादक नितीन सोपानराव ढाकणे, मो. 8446447777 (वाद : परळी न्यायलय अंतर्गत)

## मराठवाड्याच्या पत्रकारितेतला 'उत्तम' मार्गदर्शक

# ज्येष्ठ पत्रकार उत्तम हजारे

पत्रकारिता ही केवळ बातम्या देण्याचे माध्यम नसून ती समाजपरिवर्तनाची एक सशक्त यंत्रशक्ती आहे, हे आपल्या ३५ वर्षांच्या प्रदीर्घ कारकिर्दीतून सिद्ध करणारे बीड जिल्ह्यातील ज्येष्ठ पत्रकार उत्तम हजारे आज आपल्या वयाचा आणि अनुभवाचा एक महत्त्वाचा टप्पा पूर्ण करत आहेत. सिरसमार्ग (ता. गेवराई, जि. बीड) या सिंदफणा नदीच्या काठावर वसलेल्या छोट्याशा गावातील अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतून त्यांचा जीवनप्रवास सुरू झाला. बालपणात आई-वडिलांचे काबाडकष्ट आणि गरिबीचे चटके सोसत, सिंदफणेच्या अंगाखांद्यावर खेळून त्यांनी बीड शहरात महाविद्यालयीन शिक्षण पूर्ण केले. बलभीम महाविद्यालयाच्या परिसरात असतानाच त्यांच्यावर साहित्याचे आणि बहुजन चळवळीचे संस्कार झाले. तेथूनच त्यांच्यातील पत्रकाराचा आणि संवेदनशील लेखकाचा पिंड घडत गेला.

कोणतीही आदळआपट न करता, अत्यंत शांत, संयमी आणि स्थितप्रज्ञ राहून उत्तम हजारे यांनी बातमीच्या पानावर स्वतःला झोकून दिले. 'दै. नवाकाळ', 'पुढारी', 'पुण्यनगरी', 'झुंजार नेता', 'सम्राट' ते आज 'दै. लोकाशा' मधील मोठी जबाबदारी सांभाळताना त्यांनी वृत्तपत्रसृष्टीत स्वतःची मोठी विश्वासार्हता निर्माण केली. निळूभाऊ खाडिलकर, पद्मश्री डॉ. प्रतापसिंह जाधव, मुरलीधर बाबा शिंगोटे, मोतीरामजी वरपे, बबनराव कांबळे यांसारख्या दिग्गजांच्या सहवासात समृद्ध झालेल्या हजारे यांनी संपादकांचा आणि वाचकांचा विश्वास तंतोतंत जपला. ग्रामीण भागातील तरुण पत्रकारांना उभे करणे, त्यांना बातमीमूल्य शिकवणे आणि मार्गदर्शक म्हणून पाठीशी उभे राहणे हा त्यांचा सहज स्वभाव राहिला आहे.

जेव्हा बीड जिल्हा परळी येथील स्त्री-भ्रूण हत्या प्रकरणाने हादरला होता, तेव्हा 'दै. पुढारी'चे जिल्हा बातमीदार म्हणून उत्तम हजारे यांनी या संवेदनशील विषयाचा सातत्याने पाठपुरावा केला. महिनाभर वृत्तमालिका चालवून त्यांनी समाजाच्या आणि शासनाच्या डोळ्यात अंजन घातले. मुलींचा जन्मदर वाढावा म्हणून सामाजिक जागृती करताना, स्वतःच्या पदरी एक तरी मुलगी असावी ही इच्छा व्यक्त करणारा हा हळवा आणि कुटुंबवत्सल पत्रकार केवळ बातम्या छापत नव्हता, तर समाजातील वंचित घटकांसाठी खंबीरपणे उभा राहत होता. आज त्यांच्या लाडक्या लेकीवर आणि संपूर्ण कुटुंबावर त्यांचा गाढा जीव आहे.

'द सिक्रेट' या पुस्तकात म्हटल्याप्रमाणे, भूतकाळातील संघर्ष वर्तमानात 'संचित' बनून उभा राहतो. उत्तमरावांच्या धर्मपत्नीने प्रतिकूल परिस्थितीत कुटुंबाचा गाडा चालवला आणि मुलांना उच्चशिक्षित केले. ज्या कुटुंबाने एकेकाळी गरिबी पाहिली, आज त्याच कुटुंबातील मुलगा डॉक्टर झाला असून मुलगी उच्च शिक्षण घेत आहे. डॉक्टर झालेल्या मुलाने आपल्या पहिल्या ७५ हजारांच्या पगाराचा वाटा समाजाच्या पायावर अर्पण करून हजारे कुटुंबाची सामाजिक बांधिलकी पुनश्च सिद्ध केली.

शाहू-फुले-आंबेडकरांच्या विचारांची शिदोरी, शब्दांची श्रीमंती आणि जिभेचा ताठ मणका घेऊन वावरणारे उत्तम हजारे हे आजच्या नवोदित पत्रकारांसाठी एक जिवंत विद्यापीठ आहेत. "बैठ जाता हूं अकसर मिट्टी पर, क्योंकि मुझे अपनी औकात अच्छी लगती है..." या कवी हरिवंशराय बच्चन यांच्या ओळी उत्तमरावांच्या निगर्वी आणि विनम्र व्यक्तिमत्त्वाला तंतोतंत लागू पडतात. मराठवाड्याच्या वृत्तपत्रीय इतिहासात सुवर्ण पान लिहिणाऱ्या या 'ग्रामीण पत्रकारितेच्या आधारवडास' वाढदिवसाच्या आणि पुढील उदंड, निरोगी आयुष्यासाठी मनःपूर्वक हार्दिक शुभेच्छा!

**- संतोष सानप, अध्यक्ष - आष्टी तालुका पत्रकार संघ**



# पार्डीकर महाविद्यालयात 'लेखन प्रेरणा दिन' साजरा




श्री पंडितगुरु पार्डीकर महाविद्यालय शिरसाळा ता. परळी वैजनाथ जिल्हा बीड अर्थशास्त्र विभाग व राष्ट्रीय सेवा योजना विभाग आयोजित लोकशाहीर साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांची जयंती व लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांची पुण्यतिथी साजरी करण्यात आली. साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीच्या निमित्ताने लेखन प्रेरणा दिन साजरा करण्यात आला. या प्रसंगी सुरुवातीला साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या प्रतिमेने यांच्या प्रतिमेला पुष्पहारणे अभिवादन करण्यात आले त्याचबरोबर लेखन प्रेरणा दिनाच्या निमित्ताने प्रथम वर्षातील नूतन विद्यार्थ्यांना पेन देऊन त्यांना लिखाणासाठी प्रेरणा मिळावी यासाठी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी कार्यक्रमाध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ए. व्हि . जाधव, प्रमुख मार्गदर्शक तथा प्रमुख अतिथी प्रोफेसर डॉ एच. पी. कदम (राज्यशास्त्र विभाग प्रमुख) तसेच प्रमुख उपस्थितीमध्ये प्रोफेसर डॉ. जयदीप सोळुंके डॉ. बी. ए. साबळे, प्रा. डी व्हि झिंजुर्डे यांचीही उपस्थिती होती. याप्रसंगी पाहुणे तथा प्रमुख मार्गदर्शक प्रो. डॉ. एच.पी कदम मार्गदर्शन करताना म्हणाले की साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांचा जन्म अत्यंत गरीबी मध्ये झाला असला तरी आणि त्यांनी कमी कालावधी शाळांमध्ये जाऊन शिक्षण घेतले असले तरी मोठ्या प्रमाणामध्ये साहित्य लेखन केलेले आहे. अनेक कादंबऱ्या, पोवाडेसंग्रह कवितासंग्रह, कथासंग्रह, प्रवासवर्णन असे विविध प्रकारामध्ये विपुल आणि मोलाचे लेखन करून साहित्याची निर्मिती केलेली आहे. समाजामध्ये अनेक प्रकारच्या रूढी, प्रथा, परंपरा यांना तिलांजली देण्याचे काम आणि सामान्य माणसाला नायक म्हणून त्यांच्या लेखनातून मांडणी करण्याचे महान कार्य केलेली आहे. महाराष्ट्राच्या संयुक्त चळवळीमध्ये अण्णाभाऊ साठे यांचे मोलाचे योगदान आहे. मुंबई ही महाराष्ट्रामध्ये राहावी यासाठी अहोरात्र त्यांच्या पोवाड्यामधून जनजागृती करण्याचं काम त्यांनी केलेल आहे. एवढेच नव्हे तर अण्णाभाऊ साठे यांनी संपूर्ण महाराष्ट्रामध्ये फिरून काम्रेड यांच्या विचारसरणीसोबत नाटकाच्या माध्यमातून, पोवाड्याचे माध्यमातून जनजागृती करण्याचं काम केलेल आहे. अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीच्या निमित्ताने विद्यार्थ्यांनी लिखाण करण्याची प्रेरणा घ्यावी यासाठी शुभेच्छा दिल्या व लेखन प्रेरणा दिन साजरा केल्याचे फलित झाले आहे असे प्रतिपादन केले. यानंतर अध्यक्षीय समारोपात प्राचार्य डॉ ए . व्हि. जाधव यांनी अण्णाभाऊ साठे व लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या जीवन कार्यावर प्रकाश टाकला. लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचे लेखन म्हणजे अतिशय व्यापक सामाजिक सुधारणा आणि परिवर्तन करण्याचे साधन असल्याचे प्रतिपादन केले. लेखन प्रेरणा दिनाच्या निमित्ताने विद्यार्थ्यांनी साहित्य लेखन करण्याचे अण्णाभाऊ साठे यांच्याकडून प्रेरणा घ्यावी व आपल्या आयुष्यामध्ये समाजामध्ये दिसणाऱ्या ज्या काही वाईट समस्या आहेत त्याबद्दल विविध प्रकारच्या माध्यमातून लेखन केले गेले पाहिजे. या प्रसंगी महाविद्यालयातील प्रा. डॉ. जयदीप सोळुंके यांची सेवा अंतर्गत प्रोफेसर पदी पदोन्नती झाल्याबद्दल मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. याप्रसंगी कार्यक्रमाचे प्रास्ताविक अर्थशास्त्र विभाग प्रमुख डॉ. बी ए साबळे यांनी केले. आभार प्रदर्शन राष्ट्रीय सेवा योजना विभाग प्रमुख कार्यक्रमाधिकारी प्रा. डी. व्ही झिंजुर्डे यांनी मानले कार्यक्रमाचं सूत्रसंचालन डॉ. पी.बी. चिलपिंपरे यांनी केले. स्वागत गीत बीए प्रथम वर्षातील विद्यार्थी गोविंद बडे यांनी लेखन प्रेरणा दिनाच्या निमित्ताने सर्व उपस्थितांचे स्वागत केले. प्रस्तुत कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी सर्व प्राध्यापक विद्यार्थी यांनी सहकार्य केले. मोठ्या संख्येने विद्यार्थी, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व इतर नागरिक यांची उपस्थिती होती.

# आष्टी तालुका दूध संघाची शेतकऱ्यांसाठी नवी सुविधा ; 'अटल मिल्क पशुखाद्य' उपलब्ध

## 'अटल मिल्क पशुखाद्य' वापरा, दूध उत्पादन वाढवा – चेअरमन शांतीलाल भोसले यांचे आवाहन

**आष्टी (प्रतिनिधी)**

आष्टी मतदारसंघाचे आ.सुरेश धस यांच्या संकल्पनेतून वीर डेअरी फार्म पंजाब यांच्या मार्गदर्शनाखाली आष्टी तालुका दूध उत्पादक व पुरवठा सहकारी संघ मर्यादित, आष्टी यांच्या वतीने तालुक्यातील दूध उत्पादक शेतकऱ्यांसाठी `अटल मिल्क पशुखाद्य` उपलब्ध करून देण्यात आले आहे. या पशुखाद्याचा वापर करून दूध उत्पादनात वाढ करावी व आर्थिक उत्पन्नात भर घालावी, असे आवाहन संघाचे चेअरमन शांतीलाल भोसले यांनी केले आहे.

संघामार्फत उपलब्ध करून देण्यात आलेले हे पशुखाद्य दर्जेदार कच्च्या मालापासून तयार करण्यात आले असून, जनावरांच्या आरोग्यास पोषक ठरणारे आहे. नियमित वापरामुळे प्रतिदिन दूध उत्पादनात वाढ, दुधाची गुणवत्ता सुधारणा, फॅट व एस.एन.एफ.चे प्रमाण वाढणे, तसेच जनावरांची शारीरिक क्षमता व प्रजननक्षमता सुधारण्यास मदत होत असल्याचे भोसले यांनी प्रसिद्धीपत्रकात म्हटले आहे.

> **"आष्टी तालुक्यातील सर्व दूध उत्पादक शेतकरी बांधवांनी आपल्या जनावरांच्या उत्तम आरोग्यासाठी आणि आर्थिक उन्नतीसाठी 'अटल मिल्क पशुखाद्य'चा लाभ घ्यावा. अधिक दूध उत्पादन आणि गुणवत्तापूर्ण दूध निर्मितीसाठी हे पशुखाद्य निश्चितच उपयुक्त ठरेल."**
>
> **— शांतीलाल भोसले,** चेअरमन, आष्टी तालुका दूध उत्पादक व पुरवठा सहकारी संघ मर्यादित, आष्टी

या पशुखाद्यात जनावरांच्या आरोग्यास अपायकारक कोणत्याही रासायनिक घटकांचा वापर करण्यात आलेला नसल्याने ते सुरक्षित असल्याचा दावा करण्यात आला आहे. पशुखाद्याचा वापर करताना मार्गदर्शक सूचनांनुसार टप्प्याटप्प्याने सुरुवात करावी, त्यामुळे जनावरांना नव्या आहाराची सवय होऊन अपेक्षित परिणाम मिळण्यास मदत होईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

इच्छुक दूध उत्पादक शेतकऱ्यांनी आपल्या जवळच्या दूध संकलन केंद्राशी किंवा आष्टी तालुका दूध संघाच्या कार्यालयाशी संपर्क साधून `अटल मिल्क पशुखाद्य` उपलब्ध करून घ्यावे, असे आवाहन संघाच्या वतीने करण्यात आले आहे.

# ३६ वर्षांच्या प्रदीर्घ शैक्षणिक सेवेनंतर मुख्याध्यापक यू. व्ही. पवार यांचा सेवापूर्ती सत्कार सोहळा उत्साहात संपन्न

**परळी वैजनाथ (प्रतिनिधी) :-**

माध्यमिक आश्रम शाळा, शिवाजीनगर (ता. परळी वैजनाथ) येथील मुख्याध्यापक यू. व्ही. पवार यांचा ३६ वर्षांच्या प्रदीर्घ, समर्पित व आदर्श शैक्षणिक सेवेनंतर सेवानिवृत्ती निमित्त सेवापूर्ती सत्कार सोहळा दि. ३१ जुलै २०२६ रोजी भावपूर्ण वातावरणात संपन्न झाला.

या कार्यक्रमास डॉ. व्यंकटेश राठोड, पी. एस. घाडगे, भास्करमामा चाटे, यू. व्ही. पवार, ज्योतीताई पवार, कुसुमताई चाटे, किशोर पारधे तसेच कवी अरुण पवार यांच्यासह शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व मान्यवर उपस्थित होते.



यावेळी उपस्थित मान्यवरांनी पवार सरांच्या शैक्षणिक क्षेत्रातील योगदानाचा गौरव करत त्यांच्या कर्तव्यनिष्ठ, शिस्तप्रिय आणि विद्यार्थीकेंद्रित कार्यपद्धतीचे कौतुक केले. सत्काराला उत्तर देताना यू. व्ही. पवार यांनी आपल्या ३६ वर्षांच्या सेवाकाळातील अनुभव, संघर्ष आणि आठवणींना उजाळा दिला. तसेच बदलत्या काळात केवळ शासकीय नोकरीच्या अपेक्षेपेक्षा तरुणांनी उद्योजकता व व्यवसायाकडेही वळण्याची गरज असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले.

यावेळी ज्योतीताई पवार यांनी पती म्हणून आणि मुख्याध्यापक म्हणून पवार सरांनी कौटुंबिक जबाबदाऱ्या सांभाळत शिक्षण क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कार्याच्या आठवणींना उजाळा दिला. कवी अरुण पवार यांनी सादर केलेल्या कवितेने उपस्थितांची मने जिंकली.

कार्यक्रमाचे प्रभावी सूत्रसंचालन कलाशिक्षक गंगाधर क्षीरसागर यांनी केले, तर आर. आर. मोरे यांनी आभार मानले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

# महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेचे शैक्षणिक क्षेत्रात मोठे योगदान – शिवहार लहाने

## सासवड येथे महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद पुणे विभागाच्या वार्षिक नियोजन बैठकीचे आयोजन

**सासवड / पुणे (प्रतिनिधी ) :**

महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेची पुणे विभागाची वार्षिक नियोजनाची बैठक सासवड येथील म.ए.सो. वाघीरे विद्यालयात दिनांक १ व २ ऑगस्ट २०२६ रोजी आयोजित करण्यात आली आहे. या बैठकीसाठी पुणे विभागातील सातारा,सांगली, कोल्हापूर, सोलापूर व पुणे या जिल्ह्यातील महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेचे प्रमुख पदाधिकारी उपस्थित राहणार असून या दोन दिवसीय बैठकीत राज्यातील शिक्षण क्षेत्रातील विविध ज्वलंत प्रश्नांसंदर्भात विचारमंथन होणार आहे. शनिवार दिनांक १ ऑगस्ट रोजी महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेचे प्रांत अध्यक्ष वेणूनाथ कडू, पुणे विभागाचे माजी शिक्षक आमदार भगवानराव साळुंखे यांच्या प्रमुख उपस्थितीत बैठकीचे उदघाटन सत्र संपन्न होणार आहे. या बैठकीत महाराष्ट्र राज्य कोषाध्यक्ष राजेंद्र सूर्यवंशी, राज्य कार्याध्यक्ष गुलाबराव गवळे, शिक्षक परिषदेचे राज्य संघटन मंत्री किरण भावठाणकर आदींचे मार्गदर्शन लाभणार आहे. पुणे विभागातील सर्व



जिल्ह्यातील प्रमुख पदाधिकारी सुद्धा मोठया संख्येने उपस्थित राहणार असून नोव्हेंबर २०२६ मध्ये महाराष्ट्र विधान परिषदेच्या पुणे विभागाच्या शिक्षक मतदार संघाच्या निवडणुकीच्या अनुषंगाने देखील ही बैठक महत्त्वाची मानली जात आहे.

महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद गेल्या अनेक वर्षांपासून शिक्षण क्षेत्रात राष्ट्रहित, शिक्षणहित व शिक्षकहित या उद्देशाने अविरतपणे कार्य करत असून शिक्षण क्षेत्रातील अनेक सकारात्मक बदल या शिक्षक संघटनेच्या पुढाकारने झालेले असून महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेचे राज्याच्या शिक्षण क्षेत्रात आजपर्यंत मोठे योगदान असल्याचे मत महाराष्ट्र शिक्षक परिषदेचे पुणे जिल्हा कार्यवाह शिवहार लहाने यांनी बोलताना व्यक्त केले. पुणे विभागाच्या बैठकीसाठी महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेचे पुणे विभागाचे अध्यक्ष सुरेश राठोड, कार्यवाह बाळासाहेब चोपडे, विभाग कार्याध्यक्ष अमित कुलकर्णी,उपाध्यक्ष विजयकुमार माने, संदीप काळे , विभाग कोषाध्यक्ष महेश शेलार, संजीव मांढरे, संघटन मंत्री रामदास अभंग, सहकार्यवाह मोहन ओमासे, विभाग महिला आघाडी प्रमुख अंजली गोरे, सहप्रमुख श्लेषा कारंडे, सुजाता कुलकर्णी आदीं पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत.

दैनिक
# अतुल्य महाराष्ट्र

• बीड, रविवार, 2 ऑगस्ट 2026

# खोटी बदनामी आणि सामाजिक सलोखा बिघडवण्याचे काम करू नका - धनंजय मुंडेंचे माध्यमांना आणि माध्यमकर्मींना कळकळीचे आवाहन

## खोट्या बातम्या पाहून व्यथित झालो, बातमी करण्याआधी वस्तुस्थितीची शहानिशा करायला हवी - मुंडेंनी व्यक्त केली खंत

## नियोजन समिती बैठकीनंतरच्या चुकीच्या बातम्यांवरून धनंजय मुंडेंचे ट्विट



**परळी वैद्यनाथ (प्रतिनिधी)**

बीड जिल्हा नियोजन समिती बैठक आणि बैठकीनंतरचा जनता संवाद याबाबत मागील दोन दिवसांपासून ठराविक माध्यमांमध्ये दाखवल्या जात असलेल्या खोट्या, चुकीच्या व बदनामीकारक बातम्या पसरवून सामाजिक सलोखा बिघडवण्याचे काम करू नका, असे कळकळीचे आवाहन माजी मंत्री आ. धनंजय मुंडे यांनी माध्यमांना आणि माध्यमकर्मींना केले आहे.

खोट्या बातम्या पाहून व्यथित झालो, वाईट वाटले पण वस्तुस्थितीची शहानिशा करायला हवी, असे म्हणत याबाबत धनंजय मुंडे यांनी एक्स् पोस्ट करत सविस्तर माहिती दिली आहे.

धनंजय मुंडे यांनी आपल्या पोस्ट मध्ये जबाबदार माध्यमांना आणि माध्यमकर्मींना कळकळीची विनंती असे म्हणत विशेष आवाहन करत काही तक्रारी बाबतही खुलासा केला आहे. श्री मुंडे यांची पोस्ट : मागील दोन दिवसांपासून विशेष करून समाज माध्यमावर सुरू असलेल्या काही बातम्या पाहून व्यथित झालो, वाईट वाटले. ठराविक माध्यमांना माझे कळकळीचे आवाहन आहे, कृपया कोणतेही वृत्त प्रसारित करताना शहानिशा करण्याची थोडी तसदी घ्या.

बीड जिल्हा नियोजन समितीची बैठक खेळीमेळीत पार पडली, तिथे माझा आणि विरोधी पक्षातील एका लोकप्रतिनिधींचा कोणताही वाद किंवा खडाजंगी झालेली नाही. राजकारणात वैचारिक मतभेद असतीलही मात्र सौहार्द आणि संवाद असतोच, त्याला कुणीच अपवाद नाही. बैठकीतील प्रत्यक्षदर्शींकडून याची खात्री करता आली असती, मात्र अशा प्रकारच्या बातम्या चालवून काहींना जिल्ह्यातील सामाजिक सलोखा बिघडवून टाकायचा आहे!

दुसरा विषय, आदरणीय सुनेत्रा वहिनी या महिला आहेत, आधीच कौटुंबिक दुःखात आणि त्यात स्व. अजितदादांच्या माघारी प्रथमच बीड शहरात आल्या होत्या. अत्यंत गर्दीच्या ठिकाणी काही नागरिक मोठमोठ्याने बोलत असल्याने सर्वांचे म्हणणे नेमके कळणार नाही या दृष्टीने मी आपले प्रश्न शांतपणे मांडा, हळू बोला अशी विनंती केली असता त्याचेही रुपांतर धनंजय मुंडे याने शेतकऱ्यांना दम दिला असे केले जात आहे, याचे सध्याच्या काळात मला आश्चर्य वाटत नाही, कारण ठराविक माध्यम प्रतिनिधींनी तसा अजेंडा राबवण्याचा घाट घातलेला आहे.

बीड जिल्ह्यातील ९०% पेक्षा अधिक पत्रकार हे अत्यंत जबाबदारीपूर्वक काम करतात. त्यांच्या निर्भीड आणि निष्पक्ष पत्रकारितेचा मी कायम आदर करतो. मात्र काही पत्रकारांच्या बाबतीत आर्थिक गैरव्यवहार सहित अनेक तक्रारी माझ्याकडे पूर्वीच आलेल्या आहेत. परंतु कुणाचे तारुण्यात नुकसान नको, म्हणून मी वरिष्ठांना तक्रार करण्याऐवजी दुर्लक्ष केले. कुणाच्याही आर्थिक लाभ किंवा समृद्धीच्या आड मी येऊ इच्छित नाही.

जिल्ह्यात बिघडलेला सामाजिक सौहार्द हळूहळू स्थिर होत आहे, कृपया चुकीच्या बातम्या पेरून वातावरण बिघडवू नका, ही कळकळीची विनंती, असे नम्र आवाहन श्री मुंडे यांनी आपल्या पोस्टद्वारे केले आहे.

---

# देश हाच परिवार'... पंतप्रधान मोदींच्या देशाला समर्पित कार्यशैलीचा जवळून घेतलेला अनुभव

## ना . पंकजाताई मुंडेंचा भावनिक व्हिडिओ चर्चेत

**परळी वैजनाथ |** नेतृत्व म्हणजे केवळ निर्णय घेणे नव्हे, तर स्वतःला एका मोठ्या ध्येयासाठी पूर्णपणे वाहून घेणे," अशी भावना व्यक्त करत राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री पंकजाताई मुंडे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या कार्यपद्धती विषयीचा एक अनुभव मांडला आहे. दिल्लीतील भाजपच्या कोअर कमिटीच्या बैठकीत प्रत्यक्ष आलेला हा अनुभव त्यांनी सोशल मीडियावरील व्हिडिओद्वारे शेअर केला असून, त्यात मोदी यांची कामावरील निष्ठा, राष्ट्रप्रथमचा दृष्टिकोन आणि अविरत कार्यक्षमतेचा उल्लेख केला आहे.

पंकजाताई मुंडे यांनी सांगितले की, भाजपच्या कोअर कमिटीच्या बैठकीसाठी त्या दोन-तीन दिवस दिल्लीत होत्या. बैठकीच्या शेवटच्या दिवशी पंतप्रधान नरेंद्र मोदी अमेरिकेचा अधिकृत दौरा पूर्ण करून थेट बैठकीला दाखल झाले. प्रवासाचा थकवा बाजूला सारत त्यांनी प्रत्येक मतदारसंघाचा सविस्तर आढावा घेतला. स्थानिक प्रश्न, संघटनात्मक बाबी आणि विकासाशी संबंधित विविध मुद्द्यांवर त्यांनी सखोल चर्चा केली.

विशेष म्हणजे, ही बैठक तब्बल साडेआठ तास चालली. या कालावधीत केवळ दोन वेळा चहा आणि एकदा कॉफीसाठी अल्प विश्रांती घेण्यात आली. उर्वरित संपूर्ण वेळ पंतप्रधान प्रत्येक विषयात बारकाईने लक्ष घालत चर्चा करत होते. एका बैठकीकडे त्यांनी दाखविलेली एकाग्रता आणि सातत्य पाहून आपण प्रभावित झाल्याचे पंकजाताई मुंडे यांनी नमूद केले.

या अनुभवातून त्यांना सर्वाधिक जाणवलेली गोष्ट म्हणजे पंतप्रधान मोदी यांची राष्ट्राशी असलेली भावनिक बांधिलकी. ज्यांना स्वतःचा परिवार नाही, त्यांनी या देशालाच आपला परिवार मानले आहे. भारत अधिक सक्षम, समृद्ध आणि जगातील अग्रगण्य राष्ट्र व्हावे, यासाठी ते प्रत्येक क्षण समर्पित करत आहेत. बैठकीच्या दिवशी पंतप्रधान मोदी उपवासावर असल्याचा उल्लेख करत पंकजाताई मुंडे म्हणाल्या की, उपवास असूनही त्यांच्या कामातील ऊर्जा, एकाग्रता आणि उत्साह किंचितही कमी झाला नव्हता. दीर्घ बैठकीदरम्यान त्यांनी प्रत्येक विषयात सक्रिय सहभाग घेतला. शारीरिक मर्यादा ओलांडून



ध्येयासाठी सातत्याने काम करण्याची त्यांची वृत्ती प्रेरणादायी असल्याचे त्यांनी सांगितले.

या अनुभवाने स्वतःच्या राजकीय आणि सार्वजनिक जीवनाकडे पाहण्याचा दृष्टिकोन अधिक स्पष्ट झाल्याचेही त्यांनी नमूद केले. देशाच्या विकासासाठी प्रत्येकाने आपल्या परीने 'खारीचा वाटा' उचलण्याची गरज असल्याचे त्यांनी अधोरेखित केले. उत्तम प्रशासन, सकारात्मक विचार आणि समाजहिताची भावना जोपासली तरच राष्ट्र अधिक सक्षम होईल. तसेच, नकारात्मकते ऐवजी क्षमा, सकारात्मकता आणि राष्ट्रहिताला प्राधान्य देण्याची मानसिकता समाजात रुजली पाहिजे, असे आवाहनही त्यांनी केले. प्रत्येक नागरिक हा देशाच्या भविष्याचा भागीदार असून, भारताला अधिक समर्थ आणि विकसित राष्ट्र बनविण्याची जबाबदारी सर्वांचीच आहे, असा संदेश त्यांनी या व्हिडिओतून दिला आहे.


---

# कवी तथा समीक्षक प्रा.वा. ना.आंधळे यांच्या कवितांवर प्रा.आत्माराम चिमकर यांनी केली पीएच.डी

एरंडोल : येथील सुप्रसिद्ध कवी,समीक्षक तथा अनुवादक प्रा.वा. ना.आंधळे यांच्या कवितांवर एरंडोल येथील डी. डी. एस.पी.कला,वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालयातील मराठी विभाग प्रमुख प्रा.ए.टी तथा आत्माराम चिमकर यांनी पीएच.डी केली असून नुकतेच कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाने त्यांच्या प्रबंधास मान्यता देत गौरविलेय.

प्रा.चिमकर यांनी कवी वा. ना.आंधळे यांच्या कवितेचा अभ्यास हा संशोधनाचा विषय घेऊन ३९४ पानी संशोधन वयाच्या एकोणसाठाव्या वर्षी मोठ्या जिद्दीने केलेय.अनेक मराठी चर्चासत्र,मराठी कार्यशाळांमधून









त्यांनी अनेकविध मराठी साहित्यावर शोध निबंध राज्यस्तरावर,राष्ट्रीय स्तरावर,आंतरराष्ट्रीय स्तरावर यापूर्वी सादर केले असून अभ्यासू अध्यापक तथा विद्यार्थीप्रिय प्राध्यापक म्हणूनही ते ख्यातकीर्त आहेत.त्यांच्या या सुयशाचे अभिनंदन महाविद्यालयाचे अध्यक्ष माननीय श्री.अमित दादा पाटील यांनी शाल व पुष्प गुच्छ देऊन केले.त्यावेळी महाविद्यालयीन स्टाफनेही त्यांचेवर अभिनंदनाचा वर्षाव केला.याबरोबरच शैक्षणिक,सामाजिक परिघात त्यांचे कौतुक व अभिनंदन होत आहे. प्रा. चिमकर यांना याच महाविद्यालयातील डॉ.सचिन पाटील (क.ब.चौ.उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,मराठी अभ्यास मंडळ सदस्य)यांनी संशोधनाकामी मार्गदर्शन केले.

माझ्या जन्मभूमी व कर्मभूमी असलेल्या खान्देशाच्या साहित्यावर व साहित्यिकावर मला यशस्वी संशोधन करता आले.ही कृतज्ञता व्यक्त करणाऱ्या प्रा.चिमकर यांची शिक्षक म्हणून,संशोधक म्हणून उदात्त व व्यापक भूमिका निश्चितच अभिनंदनीय आहे.

---

# केज पोलिसांची धडक कारवाई; ७४ हजारांच्या अवैध दारूसाठ्यासह ७५ वर्षीय वृद्धाला अटक

**केज (प्रतिनिधी):**

तालुक्यातील उत्रेश्वर पिंपरी येथे विनापरवाना अवैध दारूची विक्री करणाऱ्या अड्ड्यावर केज पोलिसांनी अचानक छापा टाकून ७४ हजार ७२० रुपये किमतीचा देशी-विदेशी दारूचा साठा जप्त केला आहे. या कारवाईत एका ७५ वर्षीय वृद्धाला पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, १ ऑगस्ट रोजी केज पोलीस ठाण्याचे पथक हद्दीत गस्त घालत असताना सहाय्यक पोलीस निरीक्षक लक्ष्मण उंबरे यांना उत्रेश्वर पिंपरी येथील मंदिरासमोरील 'विजय हॉटेल'च्या आडोशाला चोरटी दारूविक्री सुरू असल्याची गोपनीय बातमी मिळाली. पोलीस निरीक्षक राहुल सूर्यतळ यांच्या मार्गदर्शनाखाली पथकाने दुपारी ३:०५ वाजेच्या सुमारास



हॉटेलच्या पाठीमागील पत्र्याच्या शेडवर धाड मारली.

या कारवाईत इम्पेरिकल ब्लू, रॉयल स्टॅग, मॅकडॉल नं. १, रॉयल चॅलेंज, आयकॉनिक व्हाईट व्हिस्कीच्या एक्युण १९० बाटल्या, किंगफिशर व टुबर्ग बीअरचे ७ बॉक्स तसेच टँगो पंच व बॉबी संत्रा या देशी दारूच्या २७५ बाटल्या असा एकूण ७४,७२० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

याप्रकरणी आरोपी प्रकाश शिवाजी बिडकर (वय ७५, रा. उत्रेश्वर पिंपरी, ता. केज) याच्याविरुद्ध केज पोलीस ठाण्यात गुन्हा रजि. क्र. ४८८/२०२६, महाराष्ट्र दारूबंदी कायदा कलम ६५ (ई) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस नाईक पुरुषोत्तम शेप करत आहेत.

सदर कामगिरी पोलीस अधीक्षक नवनीत काँवत, अपर पोलीस अधीक्षक चेतना तिडके व सहाय्यक पोलीस अधीक्षक वेंकटराम यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक राहुल सूर्यतळ, सपोनि लक्ष्मण उंबरे, ग्रेड पीएसआय अमेर इनामदार, पोह. बाळासाहेब अहंकारे, नितीन वारे, दादाराव देवगुडे, संतोष गित्ते आणि शिवाजी कागदे यांच्या पथकाने केली.

---

# आता प्रतीक्षा संपली ! आष्टीचे नवीन बसस्थानक प्रवाशांच्या सेवेत आ.सुरेश धस यांच्या हस्ते उद्घाटन; पावसाळ्यात प्रवाशांची गैरसोय टळणार

**आष्टी (प्रतिनिधी)**

गेल्या तब्बल १२ वर्षांपासून विविध कारणांमुळे रखडलेल्या आष्टी येथील नवीन एस. टी.बसस्थानकाची प्रतीक्षा अखेर संपली असून रविवार दि. २ रोजी सकाळी १० वाजल्यापासून हे बसस्थानक प्रवाशांच्या सेवेसाठी खुले करण्यात येणार आहे. आ. सुरेश धस यांच्या हस्ते या बसस्थानकाचे प्रातिनिधिक उद्घाटन होणार आहे.अशी माहिती आष्टी आगाराचे प्रमुख अनिल निकाळजे यांनी दिली.

आ.सुरेश धस आष्टी शहरासह तालुक्यातील हजारो प्रवाशांना अनेक वर्षांपासून नवीन बसस्थानक सुरू होण्याची प्रतीक्षा होती. दरम्यान, पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर जुन्या बसस्थानकात प्रवाशांची मोठी गैरसोय होत असल्याची बाब लक्षात घेऊन आ. सुरेश धस यांनी आठवडाभरापूर्वी एस.टी. महामंडळाच्या अधिकाऱ्यांची विशेष बैठक घेतली होती.या बैठकीत बसस्थानकाची उर्वरित कामे टप्प्याटप्प्याने पूर्ण करत तातडीने नवीन बसस्थानक सुरू करण्याचे निर्देश प्रशासनाला देण्यात आले होते. या निर्देशानंतर प्रशासनाने आवश्यक कार्यवाही पूर्ण केली असून रविवारपासून नवीन बसस्थानक प्रवाशांच्या वापरासाठी उपलब्ध होणार आहे. त्यामुळे पावसाळ्यात



प्रवाशांना सुरक्षित, स्वच्छ आणि अधिक सोयीस्कर वातावरणात बससेवेचा लाभ घेता येणार आहे. आगार प्रमुख अनिल निकाळजे यांनी सांगितले की,बसस्थानकाचे मुख्य बांधकाम पूर्ण झाले असून प्रवाशांच्या दृष्टीने आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्याआहेत.त्यामुळे बसस्थानक तातडीने सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. दरम्यान, बसस्थानकातील अंतर्गत काँक्रीटीकरण, संरक्षण भिंतीचे काम, जुन्या बसस्थानकाचे पाडकाम तसेच काही किरकोळ कामे लवकरच पूर्ण करण्यात येणार आहेत. ही सर्व कामे पूर्ण झाल्यानंतर राज्य परिवहन महामंडळाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत नवीन बसस्थानकाचे भव्य उद्घाटन आयोजित करण्यात येणार असल्याचेही प्रशासनाकडून सांगण्यात आले. आ. सुरेश धस यांनी नुकतीच बसस्थानकाची प्रत्यक्ष पाहणी करून पावसाळ्यामुळे प्रवाशांना होणाऱ्या अडचणींचा आढावा घेतला होता. त्यानंतर प्रवाशांच्या हिताला प्राधान्य देत नवीन बसस्थानक तातडीने सुरू करण्याचे आदेश त्यांनी एस.टी. महामंडळाला दिले होते. त्यांच्या पाठपुराव्यामुळे रखडलेला हा प्रश्न मार्गी लागल्याने आष्टीकर प्रवासी आणि नागरिकांमध्ये समाधान व्यक्त होत आहे. नवीन बसस्थानक सुरू झाल्यामुळे आष्टी तालुक्यातील ग्रामीण भागातील प्रवाशांना अधिक सुसज्ज सुविधा मिळणार असून सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेलाही यामुळे नवे बळ मिळणार आहे.